**शर्म अल-शेख शांती शिखर परिषदेसाठी शर्म अल-शेख, इजिप्तला MOS (KVS) यांची भेट (13 ऑक्टोबर 2025)**

13 ऑक्टोबर 2025

परराष्ट्र व्यवहार आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री श्री. किर्ती वर्धन सिंह [MOS (KVS)] हे 13 ऑक्टोबर 2025 रोजी शर्म अल-शेख, इजिप्तमध्ये आयोजित शर्म अल-शेख शांती शिखर परिषदेत उपस्थित होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष महामहिम डोनाल्ड ट्रम्प आणि इजिप्तचे राष्ट्रपती महामहिम अब्देल फताह अल-सिसी यांनी या शिखर परिषदेचे सह-आयोजन केले आणि अनेक जागतिक नेते सहभागी झाले.

2. भारत मध्यपूर्वेतील शांतता आणि संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून समस्यांचे निराकरण करण्याच्या बाजूने उभा आहे. आम्ही राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या गाझा शांतता योजनेला पाठिंबा देतो आणि ही योजना प्रत्यक्षात आणण्यात तसेच शांततेकडे वाटचाल घडवून आणण्यात मोलाची भूमिका बजावल्याबद्दल आम्ही इजिप्त आणि कतारचे कौतुक करतो.

3. गाझा पट्टीत उर्वरित सर्व बंदिवानांची सुटका आणि युद्धविराम जाहीर झाल्यानंतर ही परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेचा उद्देश हा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या या प्रदेशातील शाश्वत शांततेच्या दृष्टीकोनानुसार, प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना बळकट करणे हा होता.

4. हे भारताच्या दीर्घकालीन भूमिकेशी सुसंगत आहे, जी वाटाघाटींद्वारे दोन राष्ट्रांच्या तोडग्याला पाठिंबा देते. या प्रदेशात शाश्वत शांतता प्रस्थापित करण्याच्या सर्व प्रयत्नांना भारताचा पाठिंबा असेल.

शर्म अल-शेख

13 ऑक्टोबर 2025